MHRG190008332023

## <u>निशाणी क्र. १४ खालील आदेश</u>

प्रस्तुत अर्जाद्वारे अर्जदारने दिवाणी प्रक्रिया संहिता १९०८ आदेश ६ नियम १७ प्रमाणे दाव्यात दुरुस्त करण्यास परवानगी मिळावी अशी विनंती केली.

०२. अर्ज व सामनेवाला क्र. १ व २ यांनी नि. १७ वर व सामनेवाला क्र. ३ यांनी निशाणी क्र. १६ दिलेले म्हणणे वाचले. अर्जदारतर्फे वकील श्रीमती रचना थळे, सामनेवाला क्र. १ व २ तर्फे सहा. सरकारी वकील श्री. योगेश तेंडुलकर यांचा युक्तीवाद ऐकण्यात आला. सामनेवाला क्र. ३ तर्फे वकील सौ. वर्षा पाटील गैरहजर असल्याने त्यांनी अर्जावर दिलेले म्हणणे युक्तीवाद म्हणुन ग्राहय धरण्यात आले.

०३. अर्जदारचे कथन की, अर्जदारच्या मालकीची मौजे भोमजई, ता. महाड, जि. रायगड येथील मिळकत शासनाने नागेश्वरी धरणाकरिता अल्प बाजारभावाने संपादित केली. परिणामी, भुसंपादन अधिनियम, २८–अ (३) अन्वये संपादित मिळकतीचे योग्य मुल्य निर्धारण करण्याकरिता प्रस्तुतचा अर्ज दिला. संपादित मिळकतीकरिता रु. १,०००/– प्रति चौरस मीटरने मागणी करुन आवश्यक तो स्टॅम्प दयावा लागणार असल्याचे मुळ अर्ज परिच्छेद क्र. ९ व १० मध्ये नमुद केलेले आहे. परंतु, मुळ रेफन्स अर्ज दाखल करतेवेळी अर्जदाराची आर्थिक परिस्थिती हालाखीची असल्याने त्याने संपादित जमीनीची उक्त किंमत/मुल्य रु. १,०००/– धरुन त्यावर रु. १००/– न्यायालयीन मुद्रांक दिल्याचे रेफरन्स अर्ज परिच्छेद क्र. १० मध्ये स्पष्ट केले आहे. त्याचवेळी सदर परिच्छेदामध्ये '<u>मात्र सदर रेफरन्स अर्जाच्या सुनावणीपुर्वी रेफरन्स अर्जात योग्य ती सुधारणा/दुरुस्ती करुन वर परिच्छेदामध्ये मागितलेला बाजारभाव मागण्याचा</u>

अधिकार आम्ही या द्वारे राखुन ठेवत आहे' असा अतिरिक्त मजकुर लिहिण्यात आला. सदरचा मजकुर हा अतिरिक्त असल्याने सदर मजकुर वगळण्याकामी प्रस्तुतचा रेफरन्स दुरुस्ती अर्ज अर्जदारास दाखल करणे भाग पडले.

०४. अर्जदारचे पुढे कथन की, रेफरन्सची अदयाप सुनावणी सुरु झालेली नाही. मागणीप्रमाणे रेफन्स अर्जातील अतिरिक्त मजकुर वगळण्याची तथा रेफरन्स अर्ज दुरुस्ती करण्याची परवानगी दिल्यास सामनेवाल्यावर कोणताही अन्याय होणार नाही अथवा त्याच्या बचावास कोणतीही बाधा निर्माण होणार नाही. सबब, न्यायहितास्तव अर्ज मंजुर करण्यात यावा अशी विनंती केली.

०५. याउलट सामनेवाला क्र. १ व २ चे कथन की, अर्जास योग्य व संयुक्तीक कारण नसुन अर्ज मुदतबाहय आहे. प्रस्तावित दुरुस्तीमुळे मुळ रेफरन्स अर्जात अमुलाग्र बदल होवुन त्यांचे बचावावर विपरित परिणाम होणार आहे. परिणामी, अर्ज खर्चासह फेटाळण्यात यावा अशी विनंती केली.

०६. सामनेवाला क्र. ३ ने अर्जास हरकत असल्याचे कथन करुन न्यायहितास्तव योग्य तो आदेश व्हावा अशी विनंती केली.

०७. उभयपक्षातर्फे करण्यात आलेल्या परस्पर विरोधी युक्तिवादाचे विवेचन करण्यात आले. मुळ रेफरन्स अर्जान्वये अर्जदारने भुसंपादन अधिनियम, १८९४ चे कलम २८–अ (३) अन्वये संपादित मिळकतीचा प्रति चौरस मीटर रु. १,०००/– दराने बाजारभाव/वाढीव मोबदला मिळावा अशी विनंती करुन मुळ रेफरन्स अर्जाचे मुल्यांकन केले व आवश्यक असलेला न्यायालयीन मुंद्रांक सुध्दा नमुद केला, पंरतु पुढे मुळ रेफरन्स अर्ज दाखल करतेवेळी अर्जदारची आर्थिक परिस्थिती हलाखीची असल्याने त्यास आवश्यक न्यायालयीन मुद्रांक देण्यास असमर्थ होता. परिणामी, मुळ रेफरन्स अर्ज दाखल करताना अर्जाचे मुल्यांकन कामी संपादित मिळकतीचा एकुण उक्त किंमत रु. १,०००/– व त्यावर

रु. १००/– न्यायालयीन मुद्रांक दिला. परंतु त्याचवेळी 'मात्र सदर रेफरन्स अर्जाच्या सुनावणीपुर्वी रेफरन्स अर्जात योग्य ती सुधारणा/दुरुस्ती करुन वर परिच्छेदामध्ये मागितलेला बाजारभाव मागण्याचा अधिकार आम्ही या द्वारे राखुन ठेवत आहे' असा सुध्दा मजकुर नमुद केला.

०८. प्रस्तावित दुरुस्तीद्वारे अर्जदार सदरचा अतिरिक्त मजकुर वगळु पाहत आहे. अर्जातील मजकुर व प्रार्थना तसेच सामनेवाला क्र. १ ते ३ यांनी कैफियतीमध्ये घेतलेला बचाव लक्षात घेता, सदरचा अतिरिक्त मजकुर अर्जदारास प्रस्तावित दुरुस्तीने वगळण्याची परवानगी दिल्यास सामनेवाल्याच्या बचावावर कोणताही परिणाम होणार नसल्याचे प्रथम दर्शनी दिसुन येते. प्रस्तावित दुरुस्तीमुळे मुळ रेफरन्स अर्जाच्या स्वरुपात तथा प्रार्थनेमध्ये कोणताही बदल होणार नाही. प्रकरणामध्ये अद्याप उभयपक्षांतर्फे पुरावा नोंदविणे चालु झालेले नाही. परिणामी, प्रकरणाचा टप्पा लक्षात घेता, प्रस्तावित दुरुस्तीला कायदेशीर प्रक्रियेची बाधा येत नाही. प्रस्तावित दुरुस्तीची अर्जदारास परवानगी दिल्यास सामनेवाल्याचे कोणतेही नुकसान होणार नाही. सबब, प्रस्तुत अर्ज मंजुर होण्यास पात्र ठरतो असा निष्कर्ष नोंदवुन खालील आदेश पारीत करण्यात येतो.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. अर्जदारने पुढील तारखेपर्यत मागणीप्रमाणे अर्जात दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत दाखल करण्याचे आदेशित करण्यात येते.

३. खर्चाबाबत आदेश नाही.

महाड,
दिनांक ११/०४/२०२५

(**पी. एम. उन्हाळे**)
दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, महाड